डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, उत्तम नगर,
अमरावती

# राज्यशास्त्र विभाग
# वार्षिक अहवाल
# सत्र २०२३-२४

राज्यशास्त्र विभाग प्रमुख
डॉ. दिनेश धाकडे

प्राचार्य
डॉ. सुनील कुमार

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, उत्तम नगर, अमरावती**

**राज्यशास्त्र विभाग**

**सत्र २०२३-२४ मधील कार्यक्रमाचा अहवाल**

शैक्षणिक सत्र २०२३-२४ मध्ये राज्यशास्त्र विभागाच्या वतीने महाविद्यालयात खालील कार्यक्रम आयोजित करण्यात आलेत.

१) राज्यशास्त्र अभ्यास मंडळाच्या निवडीकरिता सभा

२) राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन

३) राज्यशास्त्र संविधान चर्चात्मक अभ्यास वर्ग

४) मेरी माटी मेरा देश अभियान

५) राष्ट्रीय युवा दिन

६) २६ नोव्हेंबर संविधान दिन

७) मतदान जनजागृती अभियान

८) विभाग प्रमुख डॉ. दिनेश धाकडे यांचे तीन शोध निबंध प्रकाशित झाले.

वरील बाबींच्या अनुषंगाने सविस्तर अहवाल खालीलप्रमाणे आहे.

## राज्यशास्त्र अभ्यास मंडळाच्या निवडीकरिता सभा

शैक्षणिक सत्र २०२३-२४ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे गठनकरिता सभा दि. ०१/१०/२०२३ ला महाविद्यालयातील सेमिनार हॉलमध्ये पार पडली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील कुमार सर होते. तर विभाग प्रमुख डॉ. डी. एस. धाकडे व राज्यशास्त्र विषयाचे विद्यार्थी यांच्यामध्ये ही सभा होऊन पदाधिकाऱ्यांची सर्वानुमते अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव, कोषाध्यक्ष, प्रसिद्धी प्रमुख व सदस्य आदी निवड करण्यात आली.



# राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्‌घाटन

दि. ०७/१०/२०२३ रोजी भाषा, सामाजिक शास्त्रे व वाणिज्य अभ्यास मंडळ याअंतर्गत राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे गठन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुनील कुमार सर तर प्रमुख उपस्थिती प्रा. पी. जी. राठोड हे होते तसेच अभ्यास मंडळाचे उद्‌घाक मा. डॉ. नरेंद्र वानखडे हे होते. उद्‌घाटनीय भाषणामध्ये भाषा, समाज परस्परांवर कसे अवलंबून आहे व आर्थिकतेशी कसे निगडीत आहे याविषयी मार्गदर्शन केले. नवनिर्वाचीत पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाला बहुसंख्येने प्राध्यापक, कर्मचारी वर्ग उपस्थित होता.



**मेरी माटी मेरा देश अभियान**

केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या निर्देशाप्रमाणे राज्यशास्त्र विभागद्वारा दि. २५/०९/२०२३ रोजी महाविद्यालयामध्ये मेरी माटी मेरा देश या भक्तीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुनील कुमार सर तर प्रमुख उपस्थिती वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. एस. के. तंत्रपाळे सर हे होते. कार्यक्रमाला उद्घाटनीय भाषणामध्ये प्राचार्यांनी मार्गदर्शन करून मेरी माटी मेरा देश कलश महाविद्यालयीन परिसरामध्ये तसेच बाहेरील परिसरामध्ये लोकांना मुठभर माती कलशमध्ये टाकण्याकरिता प्रोत्साहीत करण्यात आले. तसेच देशभक्तीपर गीत व स्लोगनद्वारे लोकांमध्ये देशप्रेमाची भावना वृद्धींगत करण्यात आली. कार्यक्रमाला संपूर्ण महाविद्यालयीन प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



# राष्ट्रीय युवा दिन

दि. १२/०१/२०२४ रोजी राष्ट्रीय युवा दिनाचे आयोजन महाविद्यालयामध्ये करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सुनील कुमार सर तर प्रमुख उपस्थिती डॉ. वर्षा गावंडे मॅडम यांनी स्वामी विवेकानंद यांच्या जीवनाव प्रकाश टाकत सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक कार्य याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. कार्यक्रमाला प्राध्यापक व विद्यार्थी वर्ग उपस्थित होता.



# संविधान चर्चात्मक अभ्यास वर्ग

दि. २०/१०/२०२३ ला राज्यशास्त्र विभागद्वारा संविधान चर्चात्मक अभ्यास वर्ग विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना चालना मिळावी या उद्देशाने प्रत्यक्ष चर्चेच्या माध्यमातून संविधानातील विविध कलमांवर चर्चा, प्रश्न, प्रतिप्रश्न करून तसेच राष्ट्राच्या विकासापुढे असलेल्या समसया जसे मराठा आरक्षण, धनगर आरक्षण, रामजन्मभूमी विवाद, पक्ष बदल, सर्वोच्च न्यायालय व निवडणूक आयोग यासंबंधी सर्वस्पर्शी व सर्वबाजून खेळीमेळीच्या वातावरणात चर्चा करून अभ्यास वर्ग संपन्न झाला. अध्यक्षस्थानी डॉ. सुनील कुमार चव्हाण सर व विभाग प्रमुख व विद्यार्थी प्रामुख्याने उपस्थित होते.



# संविधान दिन

२६ नोव्हेंबर संविधान दिन म्हणून राज्यशास्त्र विभागद्वारा महाविद्यालयातील सेमिनार हॉलमध्ये संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. सुनील कुमार सर होते. तर प्रमुख उपस्थिती प्रा. बोरकर सर होते. संविधानातील मूलभूत अधिकार व त्याला असलेली संविधानीक चौकट या विषयी प्रा. बोरकर सरांनी मार्गदर्शन केले. तसेच संविधान दिनानिमित्त उद्देशपत्रिकेचे वाचन करून सर्वांना शपथ देण्यात आली. तसेच संविधानाप्रती जागृती निर्माण करण्यात आली. तसेच संविधान जनजागृती रॅली काढण्यात आली. कार्यक्रमाला बहुसंख्येने प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.



## मतदान जनजागृती अभियान

दि. २६/१०/२०२३ राज्यशास्त्र विभागद्वारा प्राचार्य डॉ. सुनील कुमार यांच्या मार्गदर्शनात मतदान जनजागृती अभियान राबविण्यात आले. महाविद्यालयीन यशोदानगर, उत्तम नगर, जेवड नगर, महादेव खोरी परिसरामध्ये मतदान जनजागृती रॅली काढून तसेच पथनाट्य सादर करून मतदार यादीमध्ये नाव नोंदवावा व मतदान करावे असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाला विभाग प्रमुख डॉ. डी. एस. धाकडे तसेच प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी वर्ग आदींनी सक्रिय सहभाग नोंदविला.




**डॉ. डी. एस. धाकडे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख